VI) **वयोमर्यादा -**

**उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकासः 08.02.2016**

- खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 33 वर्षे दरम्यान,
- मागास प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे दरम्यान,
- अगोदरच मुंबई महानगरपालिका सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही.
- प्रकल्पग्रस्त व शारिरीकदृष्ट्या अपंग असलेल्या उमेदवाराच्या बाबत कमाल वयोमर्यादा 45 वर्षेपर्यंत शिथील करण्यात येईल.
- **माजी सैनिक-** माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील (कमाल मर्यादा 45 वर्षे)
- अपंगांची कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासन निदेशानुसार 45 वर्षे राहिल
- शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.
- अंशकालीन कर्मचा-यासाठी कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासन निदेशानुसार 46 वर्षे राहिल

VII) **निवडीचे निकष –**

पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता/अटी/शर्ती धारण करीत असलेल्या उमेदवारामधून,

**1.** उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठामार्फत चालविला जाणारा क्ष – किरण विषयातील बी. पी. एम. टी. ( Bachlor in Paramedical Technology in Radiography ) 3 वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्याचे इंटर्नशीप पूर्ण केलेली असावी. **(प्रथम प्राध्यान्य)**

**<u>किंवा</u>**

उमेदवार 12 वी ( विज्ञान ) /12 वी (mcvc) आणि रेडीओग्राफी डिप्लोमा उत्तीर्ण असावा.**(व्दितीय प्राध्यान्य)**

2. अंतिम पदवी/पदविका परिक्षा 3 पेक्षा जास्त प्रयत्नात (Attempt) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा क्ष-किरण सहाय्यक पदासाठी विचार केला जाणार नाही.
3. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून सामायिक गुणवत्ता यादीनुसार निवड करण्यात येईल.
4. पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेल्या अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची 100 गुणांची (70 थिअरी स्वरुपाचे प्रश्न + 30 प्रात्यक्षीक स्वरुपाचे प्रश्न ) बहुपर्यायी ऑन-लाइन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहीत सामाजिक तसेच समांतर आरक्षणाचा विचार करुन सामायिक गुणवत्ता/ निवड यादी बनविण्यात येईल. तथापी खात्यामार्फत व्यवसाय चाचणी प्रात्यक्षिक स्वरुपात न घेता प्रात्यक्षिक स्वरुपाचे लेखी प्रश्नाद्वारे घेण्यात येईल.

   ऑन लाईन परिक्षा उत्तीर्ण झालेल्या व क्ष – किरण विषयातील बी. पी. एम. टी. ( Bachlor in Paramedical Technology in Radiography ) पदवी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची निवडयादी क्र.**01** तयार करण्यांत येईल.

   ऑन लाईन परिक्षा उत्तीर्ण झालेल्या व 12 वी ( विज्ञान ) /12 वी (mcvc) आणि रेडीओग्राफी डिप्लोमा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची निवडयादी क्र.**02** तयार करण्यांत येईल.

   निवडयादी क्र.01 मधील उमेदवाराची प्रथम नियुक्ती करण्यांत येईल. निवडयादी क्र.01 मध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडयादी क्र.02 मधील उमेदवारांची निवड करण्यांत येईल
5. दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान झाल्यास उमेदवारांच्या प्राधान्य क्रमाकरिता खाली दिलेले निकष क्रमवारीनुसार विचारात घेण्यात येतील.

